संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या क्षेत्रात पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र.डब्ल्यूएलपी-०७१९/प्र.क्र.१९४/फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २४ जुलै, २०१९.

वाचा :- शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.डब्ल्यूएलपी-०७१९/प्र.क्र.१९४/फ-१, दिनांक २२.०७.२०१९.

प्रस्तावना :-

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान क्षेत्रात पडणारे पावसाचे पाणी उपयोगात आण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणेबाबत मा.श्री.सुनिल प्रभु यांच्या अध्यक्षतेखाली महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.डब्ल्यूएलपी-०७१९/प्र.क्र.१९४/फ-१, दि.२२.०७.२०१९ अन्वये अभ्यास समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीमध्ये मा.श्री.प्रविण दरेकर, विधान परिषद सदस्य यांचा समावेश करुन गठीत करण्याची बाब शासनाच्या विचारीधीन होती.

शासन निर्णय :-

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या क्षेत्रात पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन करण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.सुनिल प्रभू यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे :-

१	श्री.सुनिल प्रभू, विधान सभा सदस्य	अध्यक्ष
२	श्री.प्रविण दरेकर, विधान परिषद सदस्य	सह अध्यक्ष
३	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई	सदस्य
४	मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली.	सदस्य
५	बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे प्रतिनिधी.	सदस्य
६	जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई.	सदस्य
७	उपवनसंरक्षक, ठाणे वन विभाग, ठाणे.	सदस्य
८	विभागीय वन अधिकारी(वन्यजीव-१), संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली.	सदस्य सचिव

२. वरील समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील:-

- संजय गांधी राष्ट्रीय उद्यान क्षेत्रात पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे साठवण करण्याकरिता प्रभावी उपाययोजना निर्धारित करणे.
- निर्धारित केलेल्या उपाययोजना राबविण्याकरिता कालबध्द कार्यक्रम ठरविणे.
- सदर कामासाठी कामनिहाय कार्यान्वियीन यंत्रणा निश्चित करणे.
- या कामासाठी आवश्यक निधीचे स्रोत व त्याबाबतचे नियोजन व उपलब्धता.

३. सदर समितीने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या क्षेत्रात पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन करण्याबाबत अहवाल शासनास १ महिन्याच्या कालावधीत सादर करावा. समितीच्या कार्यकक्षेप्रमाणे कामे प्रभावीपणे राबविण्याकरिता समिती आवश्यकतेनुसार तज्ञ व्यक्तींचे सहाय्य घेऊ शकते.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२४१०५३०७३११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUJAY DEORAO DODAL

Digitally signed by SUJAY DEORAO DODAL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=a6a471816b9dbfd727f2e5ec4825f4678c8393d846acd1c16b8936c8b3a519c6, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SUJAY DEORAO DODAL
Date: 2019.07.24 11:04:06 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति,

१. श्री.सुनिल प्रभू, विधान सभा सदस्य.
२. श्री.प्रविण दरेकर, विधान परिषद सदस्य.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
५. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई.
७. मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली.
८. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई.
९. उपवनसंरक्षक, ठाणे वन विभाग, ठाणे.
१०.विभागीय वन अधिकारी(वन्यजीव-१), संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली.

******